## राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वाशिम
## कंत्राटी पदभरती जाहीरात २०२४-२५
## उमेदवारांकरीता सुचना क्र. १

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत **Medical Officer** ही रिक्त कंत्राटी पदे भरावयाची आहेत, त्या नुसार सदर पदांकरीता इच्छुक उमेदवारांनी जिल्हा परीषदेच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.zpwashim.com) जाहीरात मधुन दि. २१/०१/२०२५ ते ०४/०२/२०२५ रोजी पर्यंत दिलेल्या लिंक **https://forms.gle/uEWkrU4fitxmb9uA8** वर दिलेल्या स्पष्टाकरीता विहीत नमुन्यामध्ये आवश्यक शुल्क व कागदपत्रासह अर्ज अपलोड करावा. दिनांक 05 / 02 /२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जांचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सदस्य जि.ए.आ.व.कु.क.सो.<br>तथा जिल्हा शल्य चिकीत्सक<br>जिल्हा रुग्णालय, वाशिम | सदस्य सचिव जि.ए.आ.व.कु.क.सो.<br>तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम | अध्यक्ष जि.ए.आ.व.कु.क.सो.<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम |

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, वाशिम

## कंत्राटी पदभरती जाहीरात२०२४-२५

राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत सन २०२४-२५ च्या कृती आराखडया नुसार खालील दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदे आहेत. सदर रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

<table>
<tr><th>Sr. No</th><th>Name of Post</th><th>Name of Programme</th><th>Place of Posting</th><th>Qualification</th><th>Vacant Post</th><th>Caste Category</th><th>Experience</th><th>Remuneration (Per Month Consolidated</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td>6</td><td>7</td><td>8</td><td>9</td></tr>
<tr><td rowspan="7">1</td><td rowspan="7">Medical Officer</td><td>Dialysis -2,</td><td>DH-1<br>SDH-1</td><td rowspan="7">MBBS</td><td rowspan="7">11</td><td rowspan="7">SC-1,<br>ST-1,<br>OBC-2,<br>NTC-1,<br>SEBC-1,<br>EWS-2,<br>NTB/SBC-1,<br>Open-2</td><td rowspan="7">Govt/ Pvt.</td><td rowspan="7">60000/-</td></tr>
<tr><td>NPNCD-1</td><td>DH-1</td></tr>
<tr><td>L2-3</td><td>RH Mangrulpir-1,<br>RH Manora-1,<br>RH Kamargaon-1</td></tr>
<tr><td>L3-2</td><td>DH-1, SDH-1</td></tr>
<tr><td>NRC-1</td><td>DH-1</td></tr>
<tr><td>SNCU/NBSU-1</td><td>DH-1</td></tr>
<tr><td>ICU/HDU-1</td><td>DH-1</td></tr>
</table>

वरील प्रमाणे मंजुर पदे ही निव्वळ कत्रांटी पध्दतीचे असुन सदर रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी ईच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या छायांकित केलेल्या स्वयंसाक्षंकित प्रतीसह ऑनलाईन अर्ज सादर करावा. उपरोक्त नमुद केलेल्या मंजुर पदासाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि.२१/०१/२०२५ पासुन ते दिं.०४/०२/२०२५ रोजी पर्यंत **https://forms.gle/uEWkrU4fitxmb9uA8** या लिंक वर अर्ज स्विकारण्यात येतील.

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

**अर्ज स्विकारणे** :- उपरोक्त लिंक व्दारे प्राप्त अर्जांचाच विचार केला जाईल.

**अटी व शर्ती :-**

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्र. जाक्र/राआसो/मनुष्यबळ/वयोमर्यादा-शुध्दीपत्रक/४८-१८/१९ दि. २८.०५.२००९ च्या पत्रान्वये वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस, विशेपतज्ञ आणि अति विशेपतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष करण्यात आली असून त्याकरिता वय वर्ष ६० पेक्षा जास्त असलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच मुलाखतीस हजर रहावे.

२) उपरोक्त पदांकरिता ईच्छुक उमेदवारानी अर्जा सोबत (**District Integrated Health & family Welfare Society Washim EPF, Bank Name – Bank of Maharashtra, Account No – 60409857737, IFSC Code – MAHB0000279**) या नावे देय असलेला खुल्या प्रवर्गासाठी रु.२००/- व मागासवर्गीया साठी रु १००/- चा (ना परतावा) रकमेची पावती **Transaction ID** दिसेल या प्रमाणे सदर लिंक मध्ये अपलोड करणे बंधनकारक आहे.

३) जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती २९ जुन २०२५ पर्यंत असेल. सदर कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.तसेच पुढील पुर्ननियुक्ती (११ महिने २९ दिवस या कालावधीकरिता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर व तसेच राज्यस्तरावरुण सदर पदाकरीताच्या पुढील वर्षाच्या मान्यतेवर आधारीत असेल.

४) जाहीरातीत नमुद वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल तसेच शैक्षणिक अर्हता,अनुभव व नोंदणी प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल.

५) सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहीती/सुचना जिल्हा परिषद वाशिम जिल्हयाच्या www.zpwashim.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारासोबत कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६) सदर पदाकरिता प्रतिक्षा यादी ही पुढिल १२ महिण्या करिता मंजुर राहील तसेच भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास नविन भरती प्रक्रिया न करता प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जातील.

७) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

८) केंद्र/ राज्य शासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गाऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही. निवड झालेल्या

समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गाऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. यावावत उमेदवारांना कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

९) निवड झालेल्या उमेदवारांना करार पत्रातील अटी मान्य असल्याबावत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल. तसेच नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये रुजू होणे वंधनकारक राहील अन्यथा त्यांचा नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१०) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. सदर पदांकरिता अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

११) राखीव संवर्गातुन अर्ज करण्याऱ्या उमेदवारांना त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र (Cast Certificate) जोडणे आवश्यक आहे. मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर केला असल्यास त्याबाबतचे कागद पत्र सोबत जोडण्यात यावे अन्यथा उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.EWS प्रवर्गामध्ये अर्ज करण्याऱ्या उमेदवारानी EWS (Economically Weaker Section) जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१२) जाहिराती मध्ये नमुद पदांना तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र/कौन्सिलचे रजिस्ट्रेशनासाठी अर्ज सादर केल्याबाबतची पावती अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील तसेच कौन्सीलकडील नोंदणीवावत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापी अवैद्य प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रीयेतुन अपात्र ठरविले जाईल.

१३) अर्ज करणे किंवा मुलाखती करीता उपस्थित राहण्याकरिता उमेदवारांना प्रवास भत्ता व इतर भत्ता देय राहणार नाही.

१४) दोनपेक्षा अधिक हयात अपत्य असणाऱ्या उमेदवारांना सदर पदाकरीता जिल्हा परिषद वाशिम कंत्राटी पदावर निवड करण्यात येणार नाही. या करिता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जा सोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.

१५) जाहीरातीमधील पदांच्या संख्येत तसेच सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. अटी व शर्तीमध्ये बदल करणे व पदभरती स्थगित करणे / रद्द करणे यांबाबतचे सर्व अधिकार हे कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम, यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

१६) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची

टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापिठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावेत.सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत.

१७) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी. तत्सम स्वरुपात कागदपत्र सादर न केल्यास त्यास गुण देय राहणार नाही व त्या करिता निवड समिती जबाबदार राहणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणताही आक्षेप असल्यास यांचे निवारण करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांना राहतील.

१९) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२०) रिक्त पदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारास गुणानुक्रमे (Against Reservation) तात्पुरत्या स्वरुपात मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा ११ महिण्यापेक्षा जे कमी असेल त्या कालावधीकरिता नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.

२१) उपरोक्त पदांकरिता निवड प्रकिया ही अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन खालील नमुद गुणांकन पध्दती प्रमाने गुण देवून निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील. नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ (Original) कागदपत्रे निवड समिती मार्फत पडताळणी केली जाईल जर सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२२) सदर पदाकरीता खालील गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

1) Subject Knowledge (10)

2) Research & Academic Khowlede (10)

3) Leadership Quality (10)

4) Administrative Abilities 10)

5) Experience -

a) For Govt. Experience-2 Marks for one year

b) For private Experience -1 Marks for one year

Total Experience – 10 Marks Maximum

एकूण गुण - ५०

अ) सदरिल गुणाणुक्रमानुसार निवड करतांना उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात

येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवारांचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२३) उपरोक्त प्रमाणे संबंधीत पदाकरीता गुणतालीका एकुण ५० गुणांची राहिल.

२४) एकुण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

२५) उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाशी निगडीत असलेल्या शासकीय, निमशासकीय,राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

२६) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मच्याऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे अवश्यक राहील व तसे परवानगी पत्र सदर अर्जा सोबत जोडणे बंधनकारक राहील, तसेच परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

—स्वा—
सदस्य जि.ए.आ.व.कु.क.सो.
तथा जिल्हा शल्य चिकीत्सक
जिल्हा रुग्णालय, वाशिम

—स्वा—
सदस्य सचिव जि.ए.आ.व.कु.क.सो.
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

—स्वा—
अध्यक्ष जि.ए.आ.व.कु.क.सो.
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम